**A**

SL. No. : S

ಒಟ್ಟು ಪ್ರಶ್ನೆಗಳ ಸಂಖ್ಯೆ : 50 ]
Total No. of Questions : 50 ]

**CCE RR**
**REVISED**

[ ಒಟ್ಟು ಮುದ್ರಿತ ಪುಟಗಳ ಸಂಖ್ಯೆ : 8
[ Total No. of Printed Pages : 8

ಸಂಕೇತ ಸಂಖ್ಯೆ : **08-M**   Code No. : **08-M**

# ವಿಷಯ : ಪ್ರಥಮ ಭಾಷೆ — ಮರಾಠಿ
# Subject : First Language — MARATHI

**( ಹೊಸ ಪಠ್ಯಕ್ರಮ / New Syllabus )**

**( ಪುನರಾವರ್ತಿತ ಶಾಲಾ ಅಭ್ಯರ್ಥಿ / Regular Repeater )**

ದಿನಾಂಕ : 25. 06. 2019 ]   [ Date : 25. 06. 2019

ಸಮಯ : ಬೆಳಗ್ಗೆ 09-30 ರಿಂದ ಮಧ್ಯಾಹ್ನ 12-30 ರವರೆಗೆ ]   [ Time : 09-30 A.M. to 12-30 P.M.

ಗರಿಷ್ಠ ಅಂಕಗಳು : 100 ]   [ Max. Marks : 100

## विद्यार्थ्यांना सामान्य सुचना :

1. प्रश्न पत्रिकेमध्ये बहुपर्यायी आणि वस्तूनिष्ठ प्रकारचे 50 प्रश्न आहेत.

2. प्रश्न पत्रिका विरुद्ध बाजूच्या आच्छादनाने सील ( बंद ) करण्यात आली आहे. परोक्षा सुरू झाल्यावर उजव्या बाजूने कापून तुम्हाला ती उघडावयाची आहे. प्रश्न पत्रिकेमधील सर्व प्रश्न व्यवस्थित आहेत की नाहीत ते तपासून पाहा.

3. बहूपर्यायी आणि वस्तुनिष्ठ या दोन्ही प्रकारच्या प्रश्नासाठी दिलेल्या सुचनांचे पालन करा.

4. उजव्या बाजूच्या कडेला ( काठावर ) असलेली संख्या पूर्ण गुण दर्शविते.

5. पेपरची उत्तरे सोडविण्यासाठी दिलेला जास्तीत जास्त वेळ प्रश्न पत्रिकेच्या पृष्ठावर वरील भागात दिलेला आहे. त्यामध्ये प्रश्न पत्रिका वाचण्यासाठो 15 मिनिटेही दिलेली आहेत.

येथून कापा.

TEAR HERE TO OPEN THE QUESTION PAPER
प्रश्न पत्रिका येथून कापून उघडा.

Tear here

## विभाग-A

### ( गद्य पद्यांशावर आधारीत )

I. खालील प्रश्नांची उत्तरे प्रत्येकी **एका** वाक्यात लिहा : $11 \times 1 = 11$

1. महानुभाव पंथाचे संस्थापक कोण ?

2. आंधळ्यांना हत्तीचे खरे स्वरूप कोणी समजावून सांगितले ?

3. विद्या कशाप्रमाणे आहे ?

4. माणूस विद्येचा पुजारी केंव्हा होईल ?

5. डॉक्टरांच्या सांगण्यामुळे मुले कोणत्या शाळेत भरती झाली ?

6. 'वाटणी' हा पाठ कोणत्या संग्रहातून घेतला आहे ?

7. पक्षाघात झाल्यावरही फुले यांनी कोणते पुस्तक लिहिले ?

8. शकून म्हणजे काय ?

9. टिटवं म्हणजे काय ?

10. लोकसाहित्यात 'माहेरचा दूत' असे कोणत्या पक्ष्याला म्हणतात ?

11. भुकेलेल्या पोटांना काय वर्ज्य नाही ?

II. खालील प्रश्नांची उत्तरे **तीन-चार** वाक्यात लिहा : 6 × 2 = 12

12. आई-बाबा मुलाना शाळेला का पाठवित नसत ?

13. लेखक रा. रं. बोराडे यांचा थोडक्यात परिचय लिहा.

14. बेळगावी काँग्रेसमधील घटनांचे वर्णन करा.

15. "हं हळू बोल – तनयाते" संदर्भासह स्पष्टीकरण करा.

16. गुराखी कृष्ण झाला नाही असे कवी का म्हणतो ?

17. कोणता विसावा – त्यांना कशासाठी हवा ?

III. खालील प्रश्नांची उत्तरे **पाच-सहा** वाक्यात लिहा : 8 × 3 = 24

18. माणकर, आंजूरकर, आणि मोरे सरदारांनी काय केले ?

19. लेखकांच्या घरी काकूंचे आगमन कसे झाले ?

20. पावसाळ्याचा हिशेब लेखकांने कसा घातला आहे ?

21. आडावरुन घागर घेउन येताना लेखक कोणत्या प्रश्नांचं ओझं घेऊन आले ?

22. श्रीकृष्णाची प्राप्ती न झाल्यास रूक्मिणी काय करणार आहे ?

23. धर्माच्या नावाखाली ढोंगी गुरु काय काय करतो ?

24. पृथ्वी सूर्याची याचना कशी करत आहे ? तिची सध्याची अवस्था कशी आहे ?

25. 'धरण' कवितेतील स्त्रीच्या गरीब परिस्थितीचे वर्णन तुमच्या शब्दात करा.

IV. खालील प्रश्नांची उत्तरे **आठ-दहा** वाक्यात लिहा : 5 × 4 = 20

26. 'जपानी स्त्री' बद्दल वर्णन करा.

27. 'हिरवे सांगाती' या पाठाच्या आधारे बांबू, पपई, कडुनिब, आणि चाफ्याच्या वृक्षाचे सविस्तर वर्णन करा.

28. कवीने कृष्ण, कर्ण, सौभद्र, मार्कंडेय यांचे दाखले का दिलेले आहेत ? स्पष्ट करा.

29. 'सत्कार' कवितेचा सारांश तुमच्या शब्दात लिहा.

30. खालील दिलेल्या कवितेच्या ओळी पूर्ण करा –

या भारतात बंधुभाव ...................................................

.......................................................................

.......................................................................

.............................. या सकलामाजी वसू दे, दे वरचि असा दे.

## विभाग-B

## ( व्याकरणावर आधारीत )

V. खालील पर्यायातून योग्य उत्तर निवडून लिहा : 10 × 1 = 10

31. 'विद्याधिकार' ही संधी अशी सोडवितात –

(अ) विद्या + आधिकार (ब) विद्या + अधिकार

(क) विद्य + आधिकार (ड) विद्य् + अधिकार.

32. 'सीमाने गाणे म्हटले.' या वाक्यात हा प्रयोग आहे –

(अ) कर्तरी (ब) भावे

(क) कर्मणी (ड) यापैकी नाही.

33. 'मोहन निबंध लिहित आहे.' या वाक्यात हा काळ आहे.

(अ) अपूर्ण भूतकाळ (ब) पूर्ण वर्तमान काळ

(क) अपूर्ण वर्तमान काळ (ड) साधा भविष्य काळ.

34. नाव सोनुबाई, हाती .............. ही म्हण पूण करण्यासाठी खालील हे शब्द घालावे लागतील.

(अ) सोन्याचा वाळा (ब) कथिलाचा वाळा

(क) तांब्याचा वाळा (ड) चांदोचा वाळा.

35. जगी सर्वसुखी असा कोण आहे ? हे या प्रकारचे वाक्य आहे.

(अ) आज्ञार्थी (ब) उद्‌गारार्थी

(क) प्रश्नार्थी (ड) केवल वाक्य.

36. 'क्षणाक्षणाला' हा या प्रकारचा समास आहे.

(अ) अव्ययीभाव समास (ब) कर्मधारय समास

(क) द्वंद्व समास (ड) बहुव्रीही समास.

37. संस्कृत भाषेतून मराठीत जसाच्या तसा शब्द येणे याला असे म्हणतात.

(अ) तत्सम (ब) तद्‌भव

(क) देशी (ड) यापैकी माही.

38. 'किल्ल्याच्या भोवतालची भिंत' याला एक शब्द हा आहे.

(अ) बुरुज (ब) तट

(क) गड (ड) भिंत.

39. मी दररोज अभ्यास करतो. अधोरेखित शब्दाची जात ही आहे.

(अ) क्रियापद (ब) शब्दयोगी अव्यय

(क) क्रिया विशेषण (ड) सर्वनाम.

40. 'रमेश मुंबईहून आला.' अधोरेखित शब्दाची विभक्ती ही आहे.

(अ) प्रथमा (ब) चतुर्थी

(क) षष्ठी (ड) पंचमी.

VI. खालील दोन पदातील संबंध ओळखून तिसऱ्या पदाशी जुळणारा शब्द लिहा : $4 \times 1 = 4$

41. सफल : असफल : : उदार : .............

42. ? : प्रश्नार्थक चिह्न : : ! : .............

43. पक्षी : खग : : दूध : .............

44. वाडा : पुल्लींग : : इमारत : .............

VII. सूचनेप्रमाणे खालील प्रश्नांची उत्तरे लिहा : $3 \times 2 = 6$

45. वाळूमधल्या झिऱ्यासारखा पाझरतो जीवनरस.

अलंकार ओळखून लक्षणे लिहा.

46. आरक्त होय फुलुनी प्रणयी पलाश

वरील ओळीचे गण पाडून वृत्त ओळखा.

47. पुढील वाक्प्रचारांचा अर्थ सांगून वाक्यात उपयोग करा :

i) हस्तगत करणे

ii) पाणउतारा करणे.

## विभाग-C

### ( लेखन व रचनेवर आधारीत )

VIII. 48. खालील पैको **एका** कल्पनेचा विस्तार करा : 1 × 3 = 3

i) वाचाल तर वाचाल

ii) वृक्षवल्ली आम्हा सोयरे.

IX. 49. तुमच्या आत्त्याला दिवाळीसाठी आमंत्रण देणारे पत्र लिहा. 1 × 5 = 5

**किंवा**

तुमच्या गावात डासांचा प्रादुर्भाव वाढल्यान औषध फवारण्यासाठी ग्रा. पं. अध्यक्षांना विनंती अर्ज लिहा.

X. 50. खालीलपैकी **एका** विषयावर **15** ते **20** ओळी निबंध लिहा : 1 × 5 = 5

i) भारतातील शेतकऱ्यांची समस्या

ii) पर्यावरण संतुलन — काळाची गरज

iii) राष्ट्रीय एकात्मता.